नि. फौ. ख. क्र.८८/२०२०
सरकार विरुध्द लक्ष्मण डुमणे
निशाणी क्र. ३४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१**

मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नावः **देविदास जळबा डुमणे,**

वयः **६५ वर्षे,** व्यवसायः **शेती**

राहणारः **सायखेड ता.धर्माबाद जि.नांदेड.**

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. शिखरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

मी आरोपींना ओळखतो. ते माझ्या भावकीतील आहेत. माझी सायखेड येथे गट क्रमांक ८२ मध्ये साडे दहा एकर शेती आहे. दिनांक ३१/०७/२०२० रोजी दुपारी ०३.०० ते ०४.०० च्या दरम्यान सर्व आरोपी माझ्या घरी शेती का देत नाही म्हणुन भांडण करु लागले. माझे शेतात घर आहे. त्याच घरात आरोपी आत आले तेंव्हा मी, माझी पत्नी आणि मुल घरी होतो. त्यांनी अचानक घरात येऊन समोरच्या खोलीत मला लाकुड आणि लाथाबुक्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. तेवढयात माझी मुलं आवाज ऐकुण मला वाचवण्यासाठी समोरच्या खोलीत आले. त्यावेळी त्यांनी सतिश, पुजा, सुप्रिया आणि गंगासागर यांना देखील आरोपींनी मारहाण केली. तु शेतात ये तुझा जिव काढतो अशी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यांनी आई–बहिणीवरच्या घाणेरडया शिवीगाळ केल्या. माझ्या कपाळावर बेंड आले, डाव्या डोळयाला मार होता व गुडघ्याला मार होता. ज्या काठीने मला मारहाण केली, ती दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता गुन्हयात जप्त असलेली लाकडी काठी साक्षीदाराला दाखवण्यात आली. ती तीच काठी आहे. त्यास **<u>वस्तु निशाणी–अ</u>** देण्यात येत आहे. त्यानंतर मी पोलीस ठाणे धर्माबाद येथे रिपोर्ट देण्यासाठी गेलो. पोलीसांनी आम्हा सर्वांना चिठ्ठी देऊन उपचारासाठी धर्माबादच्या सरकारी दवाखाण्यात पाठवले. डॉक्टरांनी तपासले, उपचार केला व त्यानंतर रिपोर्ट देण्यासाठी मी परत धर्माबाद पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी माझा रिपोर्ट लिहुन घेतला.

आता साक्षीदाराला मुळ फिर्याद व छापील एफ.आय.आर दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. **<u>मुळ फिर्यादला निशाणी क्र.३५ व छापील एफ.आय.आर ला निशाणी क्र.३६</u>** देण्यात येत आहे.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एम. आढाव यांच्यामार्फत सदर साक्षीदाराचा उलटतपास</u>**

**०२.** आरोपी माझे भावकीतील आहेत. माझ्या घराच्या आजुबाजुला वस्ती नाही. मी त्यावेळी घराच्या आतमध्ये होतो. मी घरात असताना चार मुली, पत्नी व मुलगा होतो. सर्व आरोपी एकाच वेळी माझ्या घरात आले. हे खरे आहे की, माझे आरोपींशी शेताबाबत भांडण सुरु आहे. हे खरे नाही की, या शेताबाबत मा.उच्च न्यायालय येथे अंतिम निकाल झाला आहे. हे खरे नाही की, मा.उच्च न्यायालयाने अंतिम आदेश दिल्यानंतरच मी ही कार्यवाही केली. मी आरोपींविरुद्ध ब–याच फौजदारी कार्यवाहया केल्या आहेत. साक्षीदार सांगतो की, आम्ही ऐकमेकांविरुद्ध ब–याच कारवाहया केल्या आहेत. हे खरे आहे की, नि .फौ.प्र.क्र.३०/२०१७ मधुन आरोपी निर्दोष सुटले. माझे घर रस्त्याला लागुन आहे. माझ्या घराच्या बाजुला इतर घरे नाहीत. रस्त्याला सोडुन घरे आहेत. हे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिली आहे. हे खरे नाही की, मी आज रोजी आरोपींनी मारहाण करुन शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याचे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, आरोपी कधीही माझ्या घरी आले नाही व मी सांगितल्याप्रमाणे कोणतही घटना घडली नाही. हे खरे नाही की, शेताच्या बाबत वाद सुरु असल्याने मी खोटी कार्यवाही केली.

**<u>फेरतपास–काही नाही.</u>**

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

**(एस.ए.हरणे)**

**दिनांक: ०७.०८.२०२४**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.**